दि. ०८/११/२०२४
बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

# प्रेसनोट

## विधानसभा निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने मुंबई शहरात पथसंचलनाचे आयोजन

सार्वत्रिक विधानसभा निवडणुक - २०२४ अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातुन मुंबई शहरात नियमितपणे पथसंचलनाचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच संवेदनशील परिसरात ड्रोनव्दारे निगराणी ठेवण्यात येत आहे. त्याअन्वये आज दि. ०८/११/२०२४ रोजी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ - ०४, ०६, १२ मधील पोलीस ठाणे हद्दीमध्ये पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले.

परिमंडळ ०४ अंतर्गत अँटॉप हिल पोलीस ठाणे हद्दीमध्ये सदरचे पथसंचलन सेक्टर ६, सेक्टर ५, कोकरी आगर जंक्शन, कोकरी आगार, कामराज नगर, जय महाराष्ट्र नगर, गरीब नवाज नगर, ९० फीट रोड, जीटीबी मोनोरेल स्टेशन, मक्कावाडी जंक्शन, एमजीआर चौक याठिकाणी आयोजित करण्यात आले. सदर पथसंचलनाकरीता स.पो.आ. सायन विभाग, व.पो.नि. अँटॉप हिल, CISF प्लाटून, लिमा सेक्टर स्ट्रायकिंग तसेच अँटॉप हिल पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार हजर होते.

परिमंडळ ०६ अंतर्गत नेहरू नगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सदरचे पथसंचलन शिवसृष्टी चौकी, ९० फीट रोड, वत्सलाताई जंक्शन, ठक्कर बाप्पा जंक्शन, टिळक नगर रेल्वे स्थानक, कामगार नगर, नेहरु नगर याठिकाणी आयोजित करण्यात आले. सदर पथसंचलनाकरीता स.पो.आ. नेहरु नगर विभाग, व.पो.नि. नेहरू नगर,यांच्यासह म.सु.ब. जवान, CISF प्लाटून तसेच पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार हजर होते.

परिमंडळ १२ अंतर्गत कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे हद्दीमध्ये सदरचे पथसंचलन कार्टर रोड, दौलत नगर, चाफेकर वाडी, सुकरवाडी डेपो, ओंकारेश्वर मंदिर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान या ठिकाणी आयोजित करण्यात आले. सदर पथसंचलनाकरीता व.पो.नि. कस्तुरबा मार्ग यांच्यासह CISF प्लाटून तसेच पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार हजर होते.

बृहन्मुंबई शहरात मतदारांमध्ये आश्वासक वातावरण वृद्धिंगत करणेकामी पथसंचलनाचे आयोजन करण्याकरीता मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती यांनी केलेल्या सुचनेनुसार मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.) श्री. सत्य नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई शहरातील पाचही प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, १३ परिमंडळीय पोलीस उप आयुक्त तसेच सर्व विभागीय सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यासह पोलीस अधिकारी /अंमलदार सदर विशेष मोहिम प्रभावीपणे राबवित आहेत.

***